डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला.

**अर्थ प्रशासण विभाग,**

नियंत्रक

ई -मेल: comptroller@pdkv.ac.in

---

**मजुरांचे मजुरी व विद्युत देयकामध्ये IUMS प्रणालीवर वजाती अनुदान खर्ची करण्याची मंजुरी देण्या बाबत.**

जा.क./अप्रवि/देयके/ ८९२/२०२६

दिनांक: १९/०७/२०२६ २१

## परिपत्रक

विद्यापीठ अंतर्गत वेगवेगळया कार्यालयामध्ये आवश्यकते नुसार वेळीच अनुदान मंजुर करुन घेत नसल्यामुळे मजूरांचे मजूरी प्रदान होत नाही असे या कार्यालयाच्या निदर्शनास आले आहे. सद्यास्थिती मध्ये अवाजवी दायीत्व निर्माण होउ नये या करीता वेतन व लेखाधिकारी कार्यालयाकडुन वजाती अनुदानावर देयके पारित करणे बंद करण्यात आलेले असल्यामुळे वजाती अनुदानाचे देयके पारित होत नाहीत परिनामी मजूरांचे मजुरीचे प्रदान वेळेवर होत नसल्यामुळे अडचणी निर्माण होत आहे. यास्तव सर्व बाबींचा विचार करुन सर्व आहरण व सवितरण अधिकारी, वेतन व लेखाधिकारी यांना खालील प्रमाणे निर्देश देण्यात येत आहे.

१. सर्व कार्यालय प्रमुख, आहरण व सवितरण अधिकारी व नियंत्रण अधिकारी यांनी देयके सादर करण्यापुर्वीच वेळीच अनुदान मंजूरी आदेश प्राप्त करुन घेवुन नंतरच वेतन व लेखाधिकारी यांचे कडे देयके सादर करावे.
२. अपवादात्मक परिस्थीती मध्ये मजूरांचे मजुरीचे देयक सादर करतांना अनुदान मंजुर करुन घेणे शक्य न झाल्यास वजाती अनुदानावर देयक पारित करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. परंतु देयकाचे अनुदान प्राप्त करुन घेण्याबाबत <u>**हमीपत्र आहरण व सवितरण अधिकारी,**</u> यांनी देवून देयक पारित करण्यास्तव वेतन व लेखाधिकारी कार्यालयाला सादर करावे. सदर अनुदान तात्काळ उपलब्ध करुन घेण्याची जबाबदारी ही आहरण व सवितरण अधिकारी/नियत्रण अधिकारी यांची राहील.
३. पुर्वीचे वजाती अनुदान प्राप्त करुन न घेतल्यास त्यानंतरचे वजाती अनुदान देयक पारित करण्यात येणार नाहीत. पुर्वीचे अनुदान प्राप्त न करता पुनश्च वजाती देयक सादर केल्यास देयक पारित करण्यात येवु नये या बाबतची जबाबदारी वेतन व लेखाधिकारी यांनी यांची राहील.
४. वजाती खर्च हा फक्त मजुरीचे देयक व विद्युत देयक या बाबीकरीता मध्ये अनुज्ञेय राहील.

नियंत्रक,
डॉ. पं. दे. कृ. वि. अकोला

प्रतिलिपी,

१. मा. कुलगुरु महोदय यांचे तांत्रिक सचिव यांना मा. कुलगुरु महोदय यांचे माहिती करीता....
२. मा. कुलसचिव, डॉ. पं.दे.कृ.वि. अकोला यांना माहिती करीता ....
३. सर्व नियंत्रण अधिकारी / कार्यालय प्रमुख / आहरण व सवितरण अधिकारी पुढील कार्यवाहीस....
४. वेतन व लेखाधिकारी, अकोला / नागपुर पुढील कार्यवाहीस रवाना...
५. प्रकल्प अधिकारी IUMS यांनी दिनांक १७.०७.२०२६ रोजी झालेल्या चर्चेनुसार संगणक आज्ञावलीमध्ये आवश्यक ते फेरबदल तात्काळ करावे.
६. प्रभारी अधिकारी, संगणक कक्ष (ARIS Cell) यांनी विद्यापीठ संकेतस्थळार प्रसिध्द करावे.

नियंत्रक,
डॉ. पं. दे. कृ. वि. अकोला

Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner